| MHPU180005552013 | श्रीकांत मारूतराव काळे<br>विरूध्द<br>चंद्रकांत मारुतराव काळे व इतर |
|---|---|

## निशाणी क्र.७९ खाली आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केला आहे. वादीचे म्हणणेनुसार प्रस्तुत दावा वाटपासाठी प्रतिवादींविरूध्द दाखल केला आहे. वादीचे म्हणणेनुसार दावा दाखल करतेवेळी नजर चुकीने टायपिंगमध्ये दावा मिळकतीच्या वर्णनासोबत नजरचुकीने चतुर्सिमा घालायच्या राहुन गेल्या. तसेच, दाव्यात जाहीर ठरावाची मागणी नजरचुकीने करावयाची राहुन गेली. त्यामुळे सदर प्रकरणात प्रस्तावित दुरूस्तीमुळे दाव्याचे प्रयोजन बदलत नाही व नवीन केस निर्माण होत नाही. दुरूस्तीमुळे न्यायनिर्णयास मदत होईल व वाद मुद्दा निकाली निघेल. करीता, वादीने खालील प्रस्तावीत दुरूस्ती सुचविली आहे.

**प्रस्तावीत दुरूस्ती–**

***अ)*** *दावा कलम १अ मध्ये अ. नं. १ मध्ये "टीप – सदर जमीन सध्या प्रतिवादी नंबर ३ हीचे / यांचे नावे मूलकी रेकॉर्डला दाखल आहे हे वगळून त्याऐवजी "यांसी चतुः सिमा पूर्वेस गट नं. १४७, पश्चिमेस गट नं. १४३/२, दक्षिणेस – ओढा, उत्तरेस गट नं. १४४/१ येणेप्रमाणे चतुःसीमा असे" अशी दुरुस्तीस परवानगी असावी.*

***आ)*** *दावा कलम १अ मध्ये अ. नं. २ मध्ये "टीप सदर जमीन सध्या प्रतिवादी नं.१ व प्रतिवादी नं.४ यांचे नावे मूलकी रेकॉर्डला दाखल आहे हे वगळून त्याऐवजी "यांसी चतुःसिमा पूर्वेस गट नं. १४३/१, पश्चिमेस गट नं. १४३/३, दक्षिणेस – ओढा, उत्तरेस गट नं. १४४/१ येणेप्रमाणे चतुःसीमा असे" अशी दुरुस्तीस परवानगी असावी.*

***इ)*** *दावा कलम १अ मध्ये अ. नं. ३ मध्ये "टीप सदर जमीन सध्या वादी व प्रतिवादी नं.१ ते ३ यांचे नावे मूलकी रेकॉर्डला दाखल आहे हे वगळून त्याऐवजी "यांसी चतुः सिमा पूर्वेस गट नं. १४३/२, पश्चिमेस गट नं. १४३/४, दक्षिणेस ओढा, उत्तरेस गट नं. १४४/१ येणेप्रमाणे चतुःसीमा असे" अशी दुरुस्तीस*

*परवानगी असावी.*

***ई)*** *दावा कलम १अ मध्ये अ. नं. ४ मध्ये "टीप सदर जमीन सध्या वादी व प्रतिवादी नं. १ ते ३ हीचे यांचे नावे मूलकी रेकॉर्डला दाखल आहे हे वगळून त्याऐवजी "यांसी चतुः सिमा पूर्वेस गट नं. १४३/३, पश्चिमेस गट नं. १४३/५, दक्षिणेस ओढा, उत्तरेस गट नं. १४४/१ येणेप्रमाणे चतुःसीमा असे" अशी दुरुस्तीस परवानगी असावी.*

***उ)*** *दावा कलम १अ मध्ये अ. नं. ५ मध्ये "टीप सदर जमीन सध्या वादी यांचे नावे मूलकी रेकॉर्डला दाखल आहे हे वगळून त्याऐवजी "यांसी चतुः सिमा पूर्वेस गट नं. १४३/४, पश्चिमेस गट नं. १४२ व १३९, दक्षिणेस – ओढा, उत्तरेस गट नं. १४४/१ येणेप्रमाणे चतुःसीमा असे" अशी दुरुस्तीस परवानगी असावी.*

***ऊ)*** *दावा कलम १अ मध्ये अ. नं. ६ मध्ये "टीप सदर जमीन सध्या वादी व प्रतिवादी नं. १ यांचे नावे मूलकी रेकॉर्डला दाखल आहे हे वगळून त्याऐवजी "यांसी चतुः सिमा पूर्वेस– गट नं. १४७, पश्चिमेस गट नं. १४४, दक्षिणेस गट नं. १४३, उत्तरेस गट नं. १४२/२ व त्यापलीकडे गट नं. १४५ येणेप्रमाणे चतुःसीमा असे" अशी दुरुस्तीस परवानगी असावी.*

***ए)*** *दावा कलम १अ मध्ये अ. नं. ७ मध्ये "टीप सदर जमीन सध्या वादी व प्रतिवादी नं. १ ते ३ यांचे नावे वारसाने मूलकी रेकॉर्डला दाखल आहे हे वगळून त्याऐवजी "यांसी चतुःसिमा पूर्वेस – गट नं. १४७, पश्चिमेस – भोपळदरा, गट नं. १४४ व त्या पलीकडे पाणंद, दक्षिणेस गट नं. १४४/१, उत्तरेस – गट नं. १४५ व त्यापलीकडे पुणे–सोलापूर रोड येणेप्रमाणे चतुःसीमा असे" अशी दुरुस्तीस परवानगी असावी.*

***ऐ)*** *दावा कलम १अ मध्ये अ. नं. ८ मध्ये "टीप सदर जमीन सध्या प्रतिवादी नं. ५ व वादी व प्रतिवादी नं. १ ते ३ यांचे नावे मूलकी रेकॉर्डला दाखल आहे हे वगळून त्याऐवजी "यांसी चतुःसिमा पूर्वेस– गट नं. १४८, पश्चिमेस गट नं. १४३ व गट नं. १४४, दक्षिणेस – ओढा, उत्तरेस – गट नं. १३२५ व गट नं. १४५ येणेप्रमाणे चतुःसीमा असे" अशी दुरुस्तीस परवानगी असावी.*

***ओ)*** *दावा कलम १अ मध्ये अ. नं. ९ मध्ये "टीप सदर जमीन सध्या प्रतिवादी नंबर ३ यांचे नावे मूलकी रेकॉर्डला दाखल आहे हे वगळून त्याऐवजी "यांसी चतुः*

*सिमा पूर्वेस– गट नं. ४२६ व गट नं. ४२५, पश्चिमेस गट नं. ४२०, गट नं. ४२२ व गट नं. ४२३, दक्षिणेस गट नं. ४२४/१, उत्तरेस गट नं. ४२४/३ येणेप्रमाणे चतुःसीमा असे" अशी दुरुस्तीस परवानगी असावी.*

***औ)*** *दावा कलम १अ मध्ये अ. नं. १० मध्ये "टीप सदर जमीन सध्या वादी व प्रतिवादी नं. १ ते ३ यांचे नावे मूलकी रेकॉर्डला दाखल आहे हे वगळून त्याऐवजी "यांसी चतुः सिमा पूर्वेस गट नं. ४२६ व गट नं. ४२५, पश्चिमेस गट नं. ४२०, गट नं. ४२२ व गट नं. ४२३, दक्षिणेस गट नं. ४२४/३, उत्तरेस गट नं. ४२४/४ येणेप्रमाणे चतुःसीमा असे" अशी दुरुस्तीस परवानगी असावी.*

***क)*** *दावा कलम १अ मध्ये अ. नं. ११ मध्ये "टीप सदर जमीन सध्या वादी यांचे नावे मूलकी रेकॉर्डला दाखल आहे हे वगळून त्याऐवजी "यांसी चतुःसिमा पूर्वेस– गट नं. ४२६, पश्चिमेस गट नं. ४२०, गट नं. ४२२ व गट नं. ४२३, दक्षिणेस गट नं. ४२४/३, उत्तरेस गट नं. ४२४/५ येणेप्रमाणे चतुःसीमा असे" अशी दुरुस्तीस परवानगी असावी.*

***ख)*** *दावा कलम १अ मध्ये अ. नं. १२ मध्ये "टीप सदर जमीन सध्या प्रतिवादी नं. १ यांचे नावे मूलकी रेकॉर्डला दाखल आहे हे वगळून त्याऐवजी "यांसी चतुः सिमा पूर्वेस – गट नं. ४२६, पश्चिमेस गट नं. ४२०, गट नं. ४२२ व गट नं. ४२३ दक्षिणेस गट नं. ४२४/४, उत्तरेस गट नं. ४२४/७, येणेप्रमाणे चतुःसीमा असे" अशी दुरुस्तीस परवानगी असावी.*

***ग)*** *दावा कलम १अ मध्ये अ. नं. १३ मध्ये "टीप – सदर जमीन सध्या वादी व प्रतिवादी नं. १ ते ३ यांचे नावे मूलकी रेकॉर्डला दाखल आहे हे वगळून त्याऐवजी "यांसी चतुः सिमा पूर्वेस– गट नं. ४२६ व गट नं. ४२५, पश्चिमेस गट नं. ४२०, गट नं. ४२२ व गट नं. ४२३ दक्षिणेस गट नं. ४२४/५ उत्तरेस गट नं. ४६७ येणेप्रमाणे चतुःसीमा असे" अशी दुरुस्तीस परवानगी असावी.*

***घ)*** *दावा कलम १अ मध्ये अ. नं. १४ मध्ये "टीप सदर जमीन सध्या वादी यांचे नावे मूलकी रेकॉर्डला दाखल आहे हे वगळून त्याऐवजी "यांसी चतुः सिमा पूर्वेस – गट नं. ४२६ व गट नं. ४२५, पश्चिमेस गट नं. ४२०, गट नं. ४२२ व गट नं. ४२३ दक्षिणेस गट नं. ४२४/५, उत्तरेस गट नं. ४६७ येणेप्रमाणे चतुःसीमा असे" अशी दुरुस्तीस परवानगी असावी.*

***च)*** *दावा कलम १अ मध्ये अ. नं. १५ मध्ये "टीप– सदर जमीन सध्या वादी व*

*प्रतिवादी नं. १ ते ३ यांचे नावे मूलकी रेकॉर्डला दाखल आहे हे वगळून त्याऐवजी "यांसी चतुःसिमा पूर्वेस– गट नं. ४२६ व गट नं. ३९८, पश्चिमेस गट नं. ४२४ दक्षिणेस – गट नं. ३९९ व गट नं. ४२५ पैकी जमीन, उत्तरेस – कॅनॉल येणेप्रमाणे चतुःसीमा असे" अशी दुरुस्तीस परवानगी असावी.*

***छ)** दावा कलम ६ पूर्णतः वगळण्यात येऊन त्याऐवजी "वास्तविक वादी व प्रतिवादी नं. १ ते ३ यांचे मध्ये सन १९८४ साली घरगुती वाटप झाले. त्यावेळी प्रतिवादी नं. २ व ३ यांनी सदर वाटपात दावा मिळकती या वादी व प्रतिवादी नं. १ यांना दिल्या. त्याप्रमाणे वादी व प्रतिवादी नं. १ यांनी दावा कलम १ मधील मिळकतीमध्ये ताबा घातला असून वादी हे दावा कलम १ मधील गट क्र. १४३/३, १४३/४, १४३/५, १४४/१, ४२४/५, ४२४/६ हे संपूर्ण गट तसेच ४२५/१ मधील उत्तरेकडील १ हे. ३५ आर क्षेत्र या मिळकती वहिवाटीत आहेत तर प्रतिवादी क्र. १ हे दावा कलम १ मधील गट क्र. १४३/९, १४३/२, १४४/२, ४२४/२, ४२४/३, ४२४/४ हे संपूर्ण गट तसेच ४२५/१ मधील दक्षिणेकडील १ हे. ३४ १/२ आर क्षेत्र व १४७मधील दक्षिणेकडील ४५ १/२ आर या मिळकती वहिवाटीत आहेत. सदर वादी व प्रतिवादी नं. १ यांचे दावा मिळकतीत ताबे वहिवाट ही सन १९८४ पासून आहे. सदर वहिवाट ही वादी व प्रतिवादी नं. १ यांनी प्रतिवादी २ व ३ यांच्या समक्ष घातलेली आहे. सदर वाटपावेळी प्रतिवादी २ व ३ या प्रत्यक्ष हजर होत्या. तसेच त्या वाटपास प्रतिवादी क्र. २ व ३ यांचे पतीही हजर होते. प्रतिवादी क्र. २ यांच्या पतीने मध्यस्थी करून इतर वाटप पूर्ण केले व त्याप्रमाणे मा. तहसीलदार सो यांचेकडे वाटप प्रक्रिया पूर्ण केली. वास्तविक वादी यांनी वाटप कोर्टमध्ये करण्याची विचारणा केली असता प्रतिवादी २ व ३ यांचे पती आपण वकील आहोत आपला वाद कोर्टात नको अशी भाषा वापरली. सबब सदर वाटप हे मा. तहसीलदार सो यांचेकडे करण्यात आले. सदर वाटपावेळी सन १९८४ साली वादी व प्रतिवादी नं. १ यांनी कै. गंगुबाई मारुतराव काळे यांचे सर्व सोने नाणी हे प्रतिवादी नं. २ व ३ यांना समान हिश्शाने दिले आहे. सबब सदर वेळी प्रतिवादी नं. २ व ३ यांना सोने दिल्याने प्रतिवादी नं. २ व ३ यांना वाटपामध्ये कोणताही हिस्सा देण्याचे नाही असे साक्षीदारांसमक्ष ठरले आहे.*

*वास्तविक सदर दावा कलम १ या मिळकतीच्या ७/१२ पत्रकी प्रतिवादी २ व ३ यांची नावे लागलेने त्याचा गैरफायदा घेऊन प्रतिवादी नं. ३ यांचे पती*

*यांनी वादींकडे प्रतिवादी नं. ३ यांची मुलगी वादी यांच्या मुलाकरीता करण्याचा हट्ट धरला. परंतु वादी यांचे मुलाला प्रतिवादी नं. ३ यांची मुलगी पसंत नसल्याने वादी यांनी त्यास नकार दिलेने प्रस्तुत प्रतिवादी नं. ३ हे वादीस हक्कसोड पत्र करून देत नाही. सबब तशी तक्रार वादी यांनी प्रतिवादी नं. २ यांचे पतीकडे केल्यावर प्रतिवादी नं. २ यांचे पती यांनी त्यात मध्यस्थी केली. परंतु प्रतिवादी नं. ३ यांनी तूर्तास थांबा आम्ही हक्कसोडपत्र करून देतो अशी भाषा वादीस वापरली. या सर्व बाबी प्रतिवादी नं.२ यांचे पतीस मान्य असल्याने प्रतिवादी नं. २ हे मे. कोर्टासमोर येत नाहीत*

*प्रस्तुत गट क्र. ४२४/७ ही मिळकत वादी यांनी त्यांच्या वकिली व्यवसायातून मिळालेल्या उत्पन्नातून विठ्ठल नारायण निगडे यांचेकडून खरेदी केला असून त्याबाबत कोर्ट कचेरी झाल्या. ती वादी यांची स्वतंत्र मिळकत आहे. दाव्यात उणीव राहू नये म्हणून सदर मिळकत दाव्यात समाविष्ट केलेली आहे.*

*प्रस्तुत गट क्र. १४७ ही मिळकत प्रतिवादी नं. ५ व कै. गंगुबाई मारुतराव काळे यांनी स्त्रीधन म्हणून खरेदी केली असून त्यातील अर्धा हिस्सा प्रतिवादी नं. ५ यांची स्वतंत्र मिळकत आहे. दाव्यात उणीव राहू नये म्हणून सदर मिळकत दाव्यात समाविष्ट केलेली आहे. अशी दुरुस्तीस परवानगी असावी.*

***ज)** दावा कलम ७ मध्ये ७ संपल्यानंतर त्यापुढे, "वास्तविक सन १९८४ च्या वाटपावेळी प्रतिवादी २ व ३ यांना हिंदू एकत्र कुटुंबातील सोने व चांदी दोघींनाही देण्यात आले होते. त्यातून त्यांनी जमिनी खरेदी केल्या तसेच फ्लॅट्स घेतलेले आहेत. त्यामुळे प्रतिवादी नं. २ व ३ यांनी त्यापोटी दावा मिळकतीतील त्यांचा हिस्सा सोडून देण्याचे ठरले होते. परंतु प्रतिवादी नं. २ व ३ यांच्या पतींमुळे तसे हक्कसोडपत्र नोंदवले गेले नाही अन्यथा प्रस्तुत प्रतिवादी नं. २ व ३ यांना दावा मिळकतीमध्ये कोणताही हक्क व हितसंबंध नाही. वास्तविक सन १९८४ साली वाटपाची जी बैठक झाली त्या बैठकीत प्रतिवादी नं. २ व ३ यांचे पती स्वतः हजर होते व त्यांच्याशी झालेले चर्चेमुळेच दावा मिळकतीचे २ भाग करण्याचे ठरले होते." अशी दुरुस्तीस मे. कोर्टाची परवानगी असावी.*

***झ)** दावा कलम ८ नंतर ८अ हा नवीन पॅरा टाकणेत यावा.*

***८अ)** वास्तविक प्रस्तुत वादी व प्रतिवादी नं. १ ते ३ यांचे मध्ये सन १९८४ साली वाटप झाले असून त्या वाटपात प्रतिवादी नं. २ व ३ यांना सोने व चांदी दिलेने त्यांचा दावा मिळकतीमध्ये कोणताही हक्क व हितसंबंध राहिलेला नाही.*

*वास्तविक कै. गंगुबाई मारुतराव काळे यांचे मृत्यूनंतर प्रस्तुत प्रतिवादी नं. २ व ३ यांची नावे ७/१२ पत्रकी लागलेने*

*प्रतिवादी नं. २ व ३ त्याचा गैरफायदा घेत आहे. अन्यथा सन १९८४ साली जे वाटप झाले त्या वाटपाविरोधात प्रतिवादी यांनी कधीही तक्रार दिली नव्हती व नाही. सबब वादी व प्रतिवादी नं. १ ते ३ यांचे सन १९८४ साली वाटप झाले आहे. फक्त नाममात्र नोंदी करावयाच्या राहून गेल्या आहेत. अशी दुरुस्तीस परवानगी असावी.*

***ट)*** *दावा कलम १३ मध्ये १३ संपले नंतर त्यापुढे तसेच जाहीर ठरावासाठी रक्कम रु. १००० वर योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प दिलेला आहे अशी दुरुस्तीस परवानगी असावी.*

***ठ)*** *दावा कलम १५ अ नंतर १५ अ (अ) म्हणून*

***१५ अ (अ)*** *प्रस्तुत प्रतिवादी नं. २ व ३ यांना सन १९८४ साली सोने व चांदी दिलेने प्रतिवादी नं. २ व ३ यांचा दावा मिळकतीमध्ये कोणताही हक्क व अधिकार नाही असा मे. कोर्टाचा जाहीर ठराव व्हावा.*

उपरोक्त प्रस्तावित दुरूस्ती मंजूर करण्याची वादीने विनंती केली.

२. सदर अर्जावर प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले असता, प्रतिवादी क्र.३ तर्फे नि.क्र.८१ वर म्हणणे दाखल केले. प्रतिवादीचे म्हणणेनुसार, वादीचा सदरचा अर्ज खोटा असून तो प्रतिवादीस मान्य व कबुल नाही. तसेच, प्रतिवादी क्र.३ हिने अंशतः वाटप झालेचे व वाटपास पात्र असलेल्या हिश्याबाबत वाटपाची मागणी केली आहे. प्रतिवादीचे पुढे असे म्हणणे आहे की, वादीचा सरतपास नि.क्र.३० वर दाखल आहे तसेच, दावा दाखल झाल्यानंतर १० वर्षांनी दावा दुरूस्ती मागणे घटनात्मक व कायदेशीरदृष्या योग्य नाही. तसेच, सदर अर्जातील मागणी ही मुळ प्रकरणाशी विसंगत असून त्यामुळे दाव्याचे मुळ स्वरूपात बदल होणार आहे. तसेच, प्रतिवादीचे पुढे असे म्हणणे आहे की, वादीच्या मागणीस Estoppel by laws, conduct, Waiver या तत्त्वाची कायद्याने बाधा येते. तसेच, वादीच्या सदर अर्जातील संपुर्ण मजकूर प्रतिवादी क्र.३ ने खोटा असल्याचे नमुद करून अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र.१, २ व ४ यांनी त्यांचे म्हणणे दाखल न केल्याने सदरचा अर्ज त्यांचे म्हणणेविना पुढे चालविण्यात आला. प्रतिवादी क्र.५ यांनी दावा कबुल केला असून त्यांनी सदर अर्जावर कोणतेही म्हणणे दाखल केले नाही.

४. वादीने सदर अर्जावर लेखी युक्तीवाद नि.क्र.८३ दाखल केला असून त्यांचे युक्तीवादापुष्ठ्यर्थ न्यायनिर्णय दाखल केले आहेत. प्रतिवादी क्र.३ चे विधिज्ञांनी त्यांचे तोंडी युक्तीवादात त्यांचे म्हणणे नि.क्र.८१ मधील मजकूर पुर्नउच्चारीत केला तसेच, त्यांनी त्यांचे युक्तीवादापुष्ठ्यर्थ न्यायनिर्णय दाखल केले आहेत.

५. अर्ज, म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादींच्या वकीलांचे म्हणणे ऐकले. कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रथम याठिकाणी दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ६ नियम १७ चे अवलोकन करणे गरजेचे आहे.

> ***Order VI Rule 17 of Code of Civil Procedure- Amendment of pleadings.—***
> *The Court may at any stage of the proceedings allow either party to alter or amend his pleadings in such manner and on such terms as may be just, and all such amendments shall be made as may be necessary for the purpose of determining the real questions in controversy between the parties:*
>
> *Provided that no application for amendment shall be allowed after the trial has commenced, unless the Court comes to the conclusion that in spite of due diligence, the party could not have raised the matter before the commencement of trial.*

६. उपरोक्त वादी व प्रतिवादी यांनी दाखल केलेले न्यायनिर्णय तसेच, उपरोक्त दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ च्या अनुषंगाने प्रकरणातील तथ्यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरचा दावा हा दि.१८.०२.२०१३ रोजी केवळ दावा मिळकतीमध्ये वादीचा १/२ हिस्सा सरस निरस मानाने वाटप करून मिळण्याकरीता दाखल करण्यात आला. त्या अनुषंगाने प्रकरणात प्रतिवादी क्र.३ यांनी त्यांची कैफियत नि.क्र.१९ व दुरूस्ती कैफियत नि.क्र.१९–अ दि.१९.०१.२०१६ रोजी दाखल केली. प्रतिवादी क्र.१, २ व ४ विरूध्द दावा एकतर्फा चालविण्यात आला. प्रतिवादी क्र.५ वादीची पत्नी असुन तिने दावा कबुल केला. तद्नंतर प्रकरणात दि.२३.०३.२०१५ रोजी नि.क्र.२६ वर वादमुद्दे निश्चित करण्यात आले. तसेच, प्रकरणात वादीतर्फे पुराव्याचे सरतपासाचे शपथपत्र देखील ऑक्टोंबर

२०१५ मध्ये नि.क्र.३० वर दाखल करण्यात आले आहेत.

७. प्रस्तुत प्रकरणात वादीने पुराव्याचे शपथपत्र दाखल करून १० वर्षांपेक्षा जास्त कालावधी झाला आहे. वादीने दाव्यात सुचविलेली दुरूस्ती व मुळ दावा नि.क्र.१ चे अवलोकन केले असता, दावा परिच्छेद क्र.३ मध्ये *''दाव्यातील मिळकती वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचे वडील मारूतराव काळे यांना वडीलार्जीत वारसा हक्काने मिळालेल्या आहेत. सबब सदरच्या मिळकती वादी व प्रतिवादी यांच्या कुटूंबाच्या एकत्र मालकी वहिवाटीच्या आहेत.''* तसेच, प्रतिवादी क्र.५ या वादीच्या पत्नी असून त्यांनी त्यांचे नि.क्र.२४ वरील कैफियतमध्ये दावा मिळकती या हिंदु एकत्र कुटूंबाच्या मालकीच्या असल्याचे नमुद केले आहे. वादीने प्रस्तुत अर्जामधील प्रस्तावीत दुरूस्तीमध्ये नमुद केलेल्या परिच्छेद क्र. 'छ' मध्ये दावा मिळकत गट क्र.४२४/७ ही मिळकत वादी यांनी त्यांच्या वकीली व्यवसायातुन मिळालेल्या उत्पन्नातुन विठ्ठल नारायण निगडे यांच्याकडुन खरेदी केल्याबाबतचे नवीन तथ्य नमुद करून त्यांचे दाव्यातील विधानाशी पूर्णतः विसंगत असे विधान केले आहे. तसेच, दावा मिळकत गट क्र.१४७ मधील अर्धा हिस्सा हा प्रतिवादी क्र.५ यांची स्वतंत्र मिळकत असल्याबाबतचे तथ्य, त्यांचे मुळ दाव्याचे तथ्यांशी विसंगत असे विधान केले आहे.

८. वादीने दाव्यामध्ये दावा मिळकतीचे वाटप झाले नसल्याचे नमुद केले आहे. परंतू, प्रस्तुत अर्जातील प्रस्तावीत दुरूस्तीमधील परिच्छेद क्रमांक 'ज' मध्ये दावा मिळकतीचे सन १९८४ साली वाटप झाल्याबाबत तसेच, प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी वादी व प्रतिवादी यांचे एकत्र कुटूंबातील सोने–चांदी स्वीकारल्याने त्यांनी सदर दावा मिळकतीमधील त्यांचा हिस्सा सोडून दिल्याबाबतचे नवीन तत्थ्य जे त्यांचे मुळ दाव्याच्या विधानाशी व मागणीशी विसंगत/वेगळे विधान केले आहे. एकंदरीत वादी हे मुळ दाव्यात दावा मिळकतीचे वाटप झाले नसल्याचे नमुद करतात व प्रस्तावीत दुरूस्तीमध्ये मात्र वाटप सन १९९४ साली झाले आहे असे विसंगत विधान करून दाव्याचे स्वरूप बदलू पाहत आहेत.

९. महत्त्वाची बाब म्हणजे प्रस्तुत प्रकरणातील वादी हे स्वतः वकील असून त्यांनी सदर प्रकरणात जी प्रस्तावीत दुरूस्ती होण्याबाबत मागणी केली आहे त्या दुरूस्तीमधील दावा

मिळकतीचे स्वरूपाबाबत व पुर्वी झालेल्या सन १९८४ साली झालेल्या वाटपाबाबत वादीला माहिती असल्याचे वादीच्या अर्जावरून स्पष्टपणे दिसून येते. प्रस्तुत प्रस्तावीत दावा दुरूस्तीमध्ये जे तथ्य वादीला दावा दाखल करण्यापूर्वी माहित होते, ते वादीने दावा दाखल करते वेळी कोणत्या कारणाने दाव्यामध्ये नमुद केले नाही, याबाबत वादी काहीही नमुद करत नाही व वादी हा त्याचे मुळ दाव्याशी विसंगत असे तथ्य नमुद करून सदरची प्रस्तावीत दुरूस्ती दावा दाखल केल्यानंतर १३ वर्षांनी मागणी करतो सदर दावा दुरूस्ती अर्ज दाखल करण्यास झालेल्या उशिराबाबतचे कोणतेही संयुक्तीक कारण वादी नमुद करत नाही.

१०. स्थापीत न्यायतत्वानुसार दावा दुरूस्तीचा अर्ज निकाली काढताना उदारमतवादी दृष्टीकोण ठेवून अर्ज मंजूर करावे. परंतू, तसे दुरूस्ती अर्ज मंजूर करताना न्यायालयाने प्रथम प्रकरणात संपरिक्षा सुरु झाली आहे का? व सदर दुरूस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरूपात बदल होतो का? हे पाहणे देखील गरजेचे आहे. प्रस्तुत प्रकरणात उपरोक्त चर्चेवरून व प्रस्तावीत दुरूस्तीचा विचार करता, प्रकरणात वादमुद्दे निश्चित होवून वादीचे सरपासाचे शपथपत्र दाखल होवून १० वर्षांचा कालावधी झाला आहे. तसेच, वादीने सुचविलेली प्रस्तावीत दुरूस्ती ही त्याचे मुळ दाव्याशी व त्यातील तथ्यांशी पुर्णपणे विसंगत आहे. त्यामुळे दाव्याचे संपूर्ण स्वरूप हे बदलणार असून सदर दुरूस्ती मंजूर केल्यास प्रतिवादींचे बचावास देखील बाधा निर्माण होणार आहे. तसेच, सदर दुरूस्ती या वादीने प्रकरणातील प्रतिवादी क्र.३ यांची कैफियत दाखल झाल्यानंतर व प्रकरणात वादीने दाखल केलेला नि.क्र.४१ वरील दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २३ नियम १ प्रमाणे दाखल केलेला दावा काढून घेण्याचा अर्ज न्यायालयाने दि.११.०३.२०१९ रोजी नामंजूर केल्याने व सदर नि.क्र.४१ वरील अर्जावरील पुर्नविचार याचिका (रिव्हीव पिटीशन) नि.क्र.६८ ही देखील न्यायालयाने दि.०९.१०.२०२४ रोजी नामंजूर केल्याने सदर दाव्यातील त्रृटी भरून काढण्याकरीता दाखल केल्याचे दिसून येते. यावरून सदर प्रस्तावीत दावा दुरूस्ती अर्ज करण्यामागे वादीचा अप्रामाणिक/दुर्भावी/वाईट हेतू (mala fide) असल्याचे दिसून येते.

११. वादीचे वकीलांनी त्यांचे युक्तीवादापुष्टर्थ खालील न्यायनिर्णयांचा आधार

घेतला.

**अ. राजेशकुमार अग्रवाल व इतर वि. के. के. मोदी व इतर (AIR 2006 SC 1674)**, या प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाने दावा दुरूस्त अर्ज निकाली काढताना दुरूस्ती ही खरी किंवा खोटी हे न पाहता, तसेच दावा दुरूस्तीवर कोणताही निष्कर्ष न काढता दावा दुरूस्ती अर्ज मंजूर करावा. सदर न्यायनिर्णयात मा. सर्वोच्च न्यायालयाने पुढे असेही नमुद केले की, जर दावा दुरूस्तीमुळे प्रति पक्षाला पुर्वग्रह (prejudice) होत असेल, तर तशी दावा दुरूस्ती मंजूर करू नये. प्रस्तुत प्रकरणात वादी हा त्याचे दाव्यातील मागणी व तथ्यांचे विरूध्द पुर्ण विसंगत विधान नमुद करत आहे व दाव्याचे स्वरूप व मागणी बदलत आहे. त्यामुळे प्रतिवादीला पुर्वग्रह होतो. त्यामुळे उपरोक्त न्यायनिर्णय व सदर प्रकरणातील तथ्य वेगवेगळी असल्याने उपरोक्त न्यायनिर्णय हा वादीचे युक्तीवादाशी सुसुगत नाही. त्यामुळे प्रकरणात लागू होत नाही.

**ब. सुरिंदर सिंग वि. कपुर सिंग तर्फे वारस (AIR online 2005 SC 470)**, या प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाने दावा दुरूस्ती अर्ज हा दाव्याच्या कोणत्याही टप्प्यावर दाखल करता येतो याबाबत नमुद करण्यात आले आहे व ते स्थापीत न्यायतत्व आहे. परंतू, प्रत्येक दावा व त्यातील दुरूस्तीच्या अर्जावरील निर्णय त्या दाव्यातील तथ्यांवर घेणे न्यायालयाकडून अपेक्षीत आहे. प्रत्येक प्रकरणातील तथ्य ही सारखी नसतात. सदर दावा दुरूस्ती जरी दाव्याच्या कोणत्याही टप्प्यात करता येत असली तरी, त्या करीता काही अटी नमुद करण्यात आल्या आहेत. ज्यामध्ये दाव्याचे स्वरूप बदलत नसेल अशा वेळी दावा दुरूस्ती करता येते. प्रस्तुत प्रकरणात वादीने सुचविलेल्या दावा दुरूस्तीमुळे दाव्याचे स्वरूप बदलणार असल्याने उपरोक्त न्यायनिर्णय प्रकरणातील तथ्यांशी विसंगत असल्याने तो लागू होत नाही.

**क. दिनेश गोयल उर्फ पप्पू वि. सुमन अग्रवाल (AIR 2024 SC 4779)**, या प्रकरणात सदर न्यायनिर्णयातील प्रकरणात वादीला दावा दाखल करताना मृत्युपत्राबाबत माहित नव्हते, जेंव्हा प्रतिवादीने तो मृत्यूपत्राने मालक झाला असा बचाव घेतला, तेंव्हा वादीला सदर बाब समजली व त्यामुळे वादीचा दुरूस्ती अर्ज मंजूर करण्यात आला. प्रस्तुत प्रकरणात मात्र दावा मिळकतीबाबत वादीला पुर्वीपासून माहिती आहे. तसेच, सदर दुरूस्तीत वादी नव्याने बचाव घेत असून, नव्याने वाटपाबाबतचे कथन करतो आहे. प्रस्तुत प्रकरणातील वादी पुर्वी वाटप झाले नाही, असे नमुद करतो व दावा दुरूस्तीमध्ये वाटप सन १९८४ साली झाले, असे विसंगत विधान करतो. त्यामुळे उपरोक्त न्यायनिर्णयातील तथ्य व प्रस्तुत दाव्यातील तथ्य वेगवेगळी असल्याने उपरोक्त न्यायनिर्णय प्रकरणात लागू होत नाही.

**ड. साऊथ कोकन डिस्टीलरीज व इतर वि. प्रभाकर गजानन नाईक व इतर (AIR 2009**

**SC 1177)**, सदर प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाने दुरूस्ती अर्ज मंजूर करताना उदारमतवादी दृष्टीकोण ठेवून अर्ज मंजूर करण्याबाबत नमुद केले आहे. तसेच, न्यायालयाने उदारमतवादी दृष्टीकोण ठेवताना काही अटी देखील नमुद केल्या आहेत.

**इ. बी. के. एन. पिलारी वि. पी. पीलारी व इतर (AIR 2005 SC 614)**, मा. सर्वोच्च न्यायालयाने केवळ प्रतिवादीने उशीराने दावा दुरूस्ती आणली म्हणून त्याचा अर्ज नामंजूर करू नये, असे नमुद केले व जेव्हा सदर दावा दुरूस्तीमुळे वादीचे नुकसान भरून काढता येत असेल त्यावेळी दुरूस्ती करावी. सदर न्यायनिर्णयांतील तथ्य विचारात घेतले तर त्यामुळे त्यामध्ये प्रतिवादीने त्याचे जबाबदावा दुरूस्तीमध्ये जे मागितले ते त्यांचे पुर्वीचे जबाबाविरूध्द नसावे असेही न्यायालयाचे म्हणणे आहे. प्रस्तुत प्रकरणात वादी हा त्याचे दाव्यात व दुरूस्ती अर्जात पुर्णपणे वेगवेगळे बचाव व तथ्य मांडत आहे व जे तो दावा दाखल करतानाही सांगु शकत होता किंवा ते त्याचे स्मरणात होते. त्यामुळे उपरोक्त न्यायनिर्णय व प्रस्तुतच्या दाव्यातील तथ्य वेगवेगळे असल्याने न्यायनिर्णय लागू होत नाही.

**फ. सालेम ॲडव्होकेट बार असोसिएशन तमिळनाडू वि. युनियन ऑफ इंडीया (AIR 2005 SC 3353)**, सदर प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयासमोर दिवाणी प्रक्रिया संहितेमधील सन १९९९ व २००२ मधील सुधारणांच्या संविधानीक वैधतेबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. सदर न्यायनिर्णयामध्ये दावा दुरूस्तीबाबत देखील कायदा करण्यात आला आहे. त्यामुळे सदर न्यायनिर्णय हा दावा दुरूस्ती अर्जाच्या अनुषंगाने मार्गदर्शक आहे. सदर न्यायनिर्णयात दि.प्र.सं. आदेश ६ नियम १७ मधील Proviso (अट) नव्याने नमुद करण्यात आली. सदर न्यायनिर्णयामधील दावा दुरूस्तीबाबतच्या कसोटीमध्ये प्रस्तुतची वादीची दुरूस्ती ही दाव्याचे स्वरूप बदलणारी व वादीचे पूर्वीच स्वमरणातील बाबींसंदर्भात असून ती वादीने दावा दाखल करताना नमुद न केलेने, सदर दुरूस्ती उपरोक्त न्यायनिर्णयातील दि.प्र.सं. आदेश ६ नियम १७ चे कसोटी पर्ण करत नाही. त्यामुळे सदर न्यायनिर्णयाचा वादीला उपयोग होणार नाही.

**ग. मारूती रामचंद्र परसुतकर व इतर वि. रामदास खाटी पिदुरकर व इतर 2008 (3)ALL MR 175** सदर न्यायनिर्णयात मा. मुंबई उच्च न्यायालय नागपुर खंडपीठ यांनी या प्रकरणात दावा दुरूस्तीमुळे न्यायालयाचे अधिकार क्षेत्रात बदल होत असेल, तरीही दाव्यामध्ये दुरूस्ती करता येते असे नमुद केले. प्रस्तुत दाव्यातील वादी मागत असलेली दुरूस्ती ही अधिकारक्षेत्राबाबत नसुन उपरोक्त न्यायनिर्णयातील तथ्य हे दाव्यातील तथ्यांशी वेगळे असल्याने उपरोक्त न्यायनिर्णय लागू होत नाही.

१२. प्रतिवादीचे वकीलांनी त्यांचे युक्तीवादापुष्टर्थ खालील न्यायनिर्णयांचा आधार घेतला.

**अ. महेंद्र प्रताप सिंग वि. राम रमण व इतर, (2024 A.H.C. 95790) (Revision Petition No.38/2024)** मा. अलाहाबाद उच्च न्यायालयाने उपरोक्त न्यायनिर्णयामध्ये जर पक्षकार हे दावा दुरूस्ती अर्जान्वये पूर्वी त्यांनी मान्य केलेले तथ्य काढून घेण्याचा प्रयत्न करत असतील तर तशी दुरुस्ती मंजूर करू नये असे नमुद आहे. प्रस्तुत दाव्यात वादी हा त्यांचे मुळ दाव्याच्या विरूध्द तथ्य नमुद करत आहे व नवीन तथ्य हे अभिलेखावर आणू पाहत आहे. त्यामुळे सदर न्यायनिर्णय प्रकरणात लागू होतो.

**ब. बसवराज वि. इंदीरा व इतर (2024 I.N.S.C. 151), (Civil Appeal No.2886/2012)** सदर न्यायनिर्णयात दिवाणी न्यायालयाने वादीची दावा दुरूस्ती ही उशीराने दाखल केलेने नामंजूर केली. परंतू, मा. उच्च न्यायालयाने सदर दिवाणी न्यायालयाचा आदेश रद्द केला. त्यामुळे प्रतिवादीने मा. सर्वोच्च न्यायालयात सदर प्रकरण दाखल केले. त्यामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दिवाणी न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला व दावा दुरूस्ती नामंजूर केली. प्रस्तुत दाव्यात वादीने दावा दुरूस्ती ही उशीराने मागितली असून ती दुरूस्ती ही वादीने स्मरणात १९८४ पासून होती. त्यामुळे उपरोक्त प्रकरणातील तथ्य व न्यायनिर्णयातील तथ्य हे समान असलेने न्यायनिर्णय लागू होतो.

**क. निरज कुमार वि. दसोंढीलाल, (2024 H.H.C. 3348)** सदर न्यायनिर्णयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.प्र.सं. आदेश ६ नियम १७ चे Proviso चा मधील उहापोह करून, जर दावा दुरूस्ती ही पक्षकाराचे स्मरणात असेल व जर त्याने ती दुरूस्ती वेळेवर दाव्यात नमुद करू शकला असता, पण ती त्याने वेळेत केली नसेल, तर मात्र दाव्यात संपरिक्षा सुरू झालेवर तशी दुरूस्तीची वादीला परवाणगी देता येणार नाही. प्रस्तुत दाव्यात देखील वादीला सन १९८४ चे वाटपाबाबत माहिती होते परंतू, ते त्यांनी सन २०१३ साली दावा दाखल करताना नमुद केले नाही व ते का नमुद केले नाही? याबाबत कारण देखील स्पष्ट नाही. परंतू दाव्यात संपरिक्षा सुरू झालेवर वादी दावा दुरूस्ती मागत आहे. त्यामुळे उपरोक्त न्यायनिर्णय व दाव्याचे तथ्य एक समान असलेने उपरोक्त न्यायनिर्णय लागू होतो.

**ड. गणपत व इतर वि. अंजना व इतर (Writ Petition No.10831/2023)** सदर न्यायनिर्णयात मा. उच्च न्यायालय खंडपीठ मुंबई यांनी वादी ही वृध्द व अडाणी महिला आहे या कारणास्तव दाव्यात संपरिक्षा सुरू झालेनंतर दि.प्र.सं. आदेश ६ नियम १७ नुसार दावा दुरूस्ती मंजूर करता येणार नसलेचे नमुद केले. प्रस्तुत दाव्यात वादी हा स्वतः वकील आहे व त्यामुळे सदर न्यायनिर्णय हा प्रकरणात प्रतिवादीचे युक्तीवादाच्या अनुषंगाने त्यांना लागू होतो.

१३. उपरोक्त चर्चेवरून प्रस्तुत दाव्यामध्ये संपरिक्षा सुरू झाल्यानंतर वादीने दावा दुरूस्तीबाबत विनंती केली आहे. तसेच, सदर प्रस्तावीत दावा दुरूस्ती मंजूर केल्यास दाव्याचे

स्वरूप बदलणार आहे. तसेच, प्रस्तावीत दावा दुरूस्तीमध्ये वादी हा त्याचे मुळ दाव्यातील व सन २०१५ साली दाखल केलेल्या सरतपासाच्या शपथपत्रातील मान्य केलेल्या बाबी या काढुन घेवू पाहत आहे. तसेच, सदरचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादीचे बचावावर परिणाम होवून त्यांना पर्वग्रह (Prejudice) होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदरचा वादीचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित नाही. करीता, मी खालील आदेश पारीत करतो–

## :: आदेश ::

१. वादीचा निशाणी ७९ वरील अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

SHAILENDRA NANDKISHOR PATIL

Digitally signed by SHAILENDRA NANDKISHOR PATIL
Date: 2026.08.21 17:48:13 +0530

ठिकाणः–दौंड.

दिनांकः– २०.०८.२०२६

[एस. एन. पाटील]
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर तथा
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी दौंड.

## CERTIFICATE

"I affirm that the contents of this PDF file judgment/order are same word for word as per original order/judgment"

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | Vaibhav Dhananjay Padman |
| Court name | : | S.N. Patil<br>Jt. Civil Judge, Jr. Div. Daund,<br>Tq. Daund, Dist. Pune |
| Date of order | : | 20.08.2026 |
| Order signed by<br>Presiding Officer on | : | 21.08.2026 |
| Order uploaded on | : | 21.08.2026 |